M. S. Board Of Secondary And
Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi,
Navi Mumbai-४०० ७०३.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

क्र.मुंविमं/माध्य.परीक्षा/ उच्च. माध्य.परीक्षा 2298
मुंबई विभागीय मंडळ,
मुंबई ४००७०३
दि.14/ ०५/ २०२६

प्रति,

मुख्याध्यापक /प्राचार्य,
मुंबई विभागीय मंडळ कार्यकक्षेतील शाळा ,
ठाणे/रायगड/पालघर जिल्हा,
पश्चिम/दक्षिण/उत्तर मुंबई.

विषय:—जून—जुलै २०२६ मध्ये आयोजित करावयाच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १०वी) उच्च. माध्य.परीक्षा प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेची अंतिम वेळापत्रके जाहीर करणेबाबत.

संदर्भ:— १) जा.क्र.रा.मं/परीक्ष—६/२०१४ दि.१२/०५/२०२६

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, जून—जुलै २०२६ मध्ये आयोजित करावयाच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १०वी) उच्च. माध्य.परीक्षा प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेची अंतिम वेळापत्रके जाहीर करणेबाबतचे प्रकटन सोबत जोडलेले आहे. याची सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी नोंद घ्यावी.

( ज्योत्स्ना रशिद—पवार)
विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी , नवी मुंबई ४००७०३

सोबत तक्ता जोडलेला आहे.

प्रति:— सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,

प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:—

१. शिक्षणाधिकारी (माध्य.) ठाणे/रायगड/पालघर जिल्हा
२. शिक्षण निरीक्षक पश्चिम/दक्षिण/उत्तर विभाग मुंबई.
३. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवाशी विकास प्रकल्प कार्यालय, डहाणू/पालघर/शहापूर/जव्हार/पेण.

यांनी आपल्या अधिपत्याखाली सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना परिपत्रक सत्वर निदर्शनास आणावे.

Letter Head A४ Makhajankar sir

Telephone : २७६५२४४५,२७६६२५०४,२७८८१०७७,२७८८१०७५,२७८९९९८७ * Fax : २७६५९४९१/२७८८१३४९
Email : sschsc.mumbaiboard@gmail.com * Website : www.sscboardmumbai.in

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

**विषय– जून–जुलै २०२६ मध्ये आयोजित करावयाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांची अंतिम वेळापत्रके जाहीर करणेबाबत**

## ।। प्र क ट न ।।

---

जून–जुलै २०२६ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छ.संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | तपशिल | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा कालावधी (सर्वसाधारण, व्दिलक्षी व व्यवसाय अभ्यासक्रम तसेच माहिती तंत्रज्ञान व सामान्य ज्ञान विषयांची ऑनलाईन परीक्षा) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | लेखी परीक्षा | मंगळवार, दि. १६ जून, २०२६ ते बुधवार, दि. ०८ जुलै, २०२६ | मंगळवार, दि. १६ जून, २०२६ ते मंगळवार, दि. ३० जून, २०२६ |
| २. | प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा | मंगळवार, दि. १६ जून, २०२६ ते बुधवार, दि. ०८ जुलै, २०२६ (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह) | मंगळवार, दि. १६ जून, २०२६ ते मंगळवार, दि. ३० जून, २०२६ |

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या अधिकृत संकेतस्थळावर दि. १२/०५/२०२६ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच सोशल मिडीया किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये. यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास मंडळ जबाबदार राहणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १२/०५/२०२६

Mali

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.